**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 12 No.2 Nov-Dec 2024

# छत्रपती शिवाजी महाराजांचे जलव्यवस्थापन:एक अभ्यास

**रंगराव बाजीराव साळुंके**
छ.शिवाजी मा.उच्च माध्यमिक विद्यालय, दांडेगाव
**Corresponding Author:** रंगराव बाजीराव साळुंके
DOI- 10.5281/zenodo.14650050

**प्रस्तावना:**

मानवाच्या उत्पत्तीपासून मानव व पाणी याचा जवळचा संबंध आपल्याला दिसतो. किंबहुना मानवाच्या प्रारंभिक आयुष्याचा अभ्यास करता मानवाने आपल्या वस्त्या पाण्याच्या सानिध्यात स्थापन केलेल्य आढळून येतात .म्हणून सप्तसिंधूच्या प्रदेशात सिंधू कालीन समाज आपले घरेदारे बांधून सिंधू संस्कृती सारखी एका सधन नागरी संस्कृती उदयास अनु शकले.प्राचीन कालखंडा प्रमाणे मध्युगीण काळातही जलस्त्रोतांचे साठे तत्कालीन शासकांनी स्थापन केलेले दिसतात उदा.झिलोका शहर उदयपुर राजस्थान ,खजाना बाऊडी मराठवाडा बीड इत्यादी अशा जल साठ्यांचा उल्लेख करता येईल . तर महाराष्ट्राचा विचार करता महाराष्ट्रात वाहणाऱ्या नदया ह्या हंगामी स्वरूपाच्या असल्यामुळे पावसाळयात पाण्याने तुडुंब भरून वाहतात .तर उन्हाळ्यात कोरड्या पडतात या नद्याच्या पाण्याचे योग्य व्यवस्थापन नसल्यामुळे महाराष्ट्राला सतत पाणी टंचाईला तोंड द्यावे लागले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी त्या काळात आपल्या स्वराज्यात ज्या जलव्यवस्थापनाच्या काही योजना आखल्या व त्यातून ३०००ते ४००० फुट उंच असणाऱ्या गडावर ज्या प्रमाणे त्यांनी जलव्यवस्थापनाची कामे केली व गाड्कील्यांना पाणी टंचाई पासून मुक्त केले. त्याच्या या जलव्यवस्थापनातील काही गोष्टीचा अभ्यास केल्यास तो महाराष्ट्राला पाणी टंचाई पासून मुक्त कारणासाठी नक्कीच मार्गदर्शक ठरेल.

**उद्दिष्ट्ये** :

१) शिवपूर्व कालीन जलस्त्रोतांचा आढावा घेणे.
२) शिवकालीन जलव्यवस्थापनाच अभ्यास करणे.
३) शिवकालीन गडावरील जल साठ्यांचा अभ्यास करणे.

**शिवपूर्व काळातील जलव्यवस्थापन :**

जगाच्या पाठीवर जलव्यवस्थापना बद्दल प्राचीन काळापासून उल्लेख आढळतात.प्राचीन काळात पाणी व्यवस्थापनाची अनेक पुरावे ऋग्वेद व यदुर्वेदात सापडतात.जगाचा पाणी व्यवस्थापनाचा इतिहास पहिला तर जगात सर्वात प्रथम नाईल नदीवर कोशेश येथे इ.स.पू.२९०० च्या सुमारास धरण बांधण्यात आले होते.या धरणा ची उंची १५ मी होती मिनिझ या राज्याने मेंफीस या राजधानीला पाणी पुरवण्यासाठी बांधले होते.

इ.स.पू.३२२ मध्ये मौर्य सत्तेची स्थापना झाली.त्यावेळी महाराष्ट्र अश्मक या नावाने ओळखल्या जात असे. या काळात महाराष्ट्र व गुजरातचा काही प्रदेश मौर्य साम्राज्यात येत असल्याने मौर्य शासक सम्राट चंद्रगुप्त मौर्य याने या प्रदेशात जल व्यवस्थापनाची अनेक कामे केलेली पाहायला मिळतात .त्याने गुजरात येथील गिरनार येथे सुदर्शन झील /सरोवर ची निर्मिती करून त्या काळातील पाणी प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला होता.मौर्या नंतर महाराष्ट्रावर सातवाहन सत्ता होती .सातवाहनानी आपली राजधानी प्रतिष्ठान आजचे पैठण या ठिकाणी स्थापन केली होती.त्याचे महत्वाचे कारन म्हणजे हे शहर गोदावरी नदी काठी असल्यामुळे या भागातील सुपीक जमीन व मुबलक पाणी पुरवठा असावा. पुढे राष्ट्रकुट सत्ता स्थापन झाली त्या काळात काही प्रमाणात जलव्यवस्थापनाची कामे झाली पण ती तात्पुरत्या स्वरुपाची होती.पुढील काळात मुस्लीम सत्तेची स्थापना झाली. मोगल काळात शेरशहा व शहाजान याने भारतात मोठ्या प्रमाणात विहिरी खोडून जलव्यवस्थापनाची कामे केल्याची इतिहासात नोंद आढळते .पण त्याचे प्रमाण उत्तर भारतात जास्त होते.

वरील प्रमाणे इतिहासाचा अभ्यास करता शिवपुर्काळातील जलव्यवस्थापन हे नैसर्गिक स्त्रोतावर अवलंबून असल्यचे पाहायला मिळते त्यामुळे मध्ययुगीन काळात पडत असलेल्या सततच्या दुष्काळाना व पाणीटंचाईला लोकांना सामोरे जावे लागत असल्याचे दिसून येते.

**शिवरायांची जलव्यवस्थापनातील दूरदृष्टी:**

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची निर्मिती केली.या स्वराज्याला जमिनीचा तुकडा न मानता आपला परिवार मानला. लोकांच्या सुख दु:खात सहभागी होऊन त्यांच्या व्यथा समजून त्यांचे प्रश्न सोडवण्याचा सतत प्रयत्न केला.शिवकाळात बहुतांश लोक शेती करणारे कष्टकरी लोक होते,बहुतांश लोकांचे उपजीविकेचे साधन शेती होते, स्वराज्याची भौगोलिक रचना ,प्रजण्याचे अल्प प्रमाण व सतत पडत असलेला दुष्काळ यामुळे त्याकाळी पाणी टंचाईला तोंड द्यावे लागत असे.ज्याप्रमाणे शेतीला पाण्याची आवशकता असते त्याच प्रमाणे गडावरही माणसाना पाण्याची आवशकता होती. जे किले बांधले किवा

जिंकले होते त्या वर ही पाणी व्यवस्थापनाची आवशकता भासत होती.इ.स.१६७० मध्ये भरतगडच्या टेकडीवर छ. शिवाजी महाराजांनी किल्ला बांधण्याच्या दृष्टीने पाहणी केली परंतू या ठिकाणी पाण्याची कमतरता पाहतात तेथे किल्ला बांधण्याचे रद्द केले होते.

छ.शिवाजी महाराजांनी गाड्कील्याच्या रक्षणासाठी पाणी अत्यंत महत्वाचे आहे हे जाणले होते.त्यामुळे किल्ल्यावर पाण्याची व्यवस्था करण्यावर त्यांनी भर दिला गडावर वर्षभर पुरेल व प्रसंगी गडावर हल्ला झाला तरी अशा आणीबाणी काळात ही शिबंदिला पुरून पाणीसाठा शिल्लक कसा राहील याची महाराजांनी काळजी घेतली होती.यातून शिवरायांचा जलव्यवस्थापनातील दूरदृष्टीकोण पाहायला मिळतो. छ.शिवाजी महाराजांनी जलव्यवस्थापनाची नीती अखात असताना काही नियम ठरवले होते ते रामचंद अमात्य यांना लिहिलेल्या पात्रातून दिसून येतात.

**गडावरील जलव्यवस्थापन:**

छ.शिवाजी महाराजांनी स्वराज्यात गडांना अत्यंत महत्वाचे स्थान दिले आहे. त्यामुळे त्यांनी अनेक गड जिंकले तर अनेक गडांचे बंदकाम केले आहे.महाराजांनी गडांच्या रक्षणास पाणी किती महत्वाचे आहे हेरले होते .एखांदा गड बांधत असताना छ.शिवाजी महाराजांनी काही आदेश काढले होते ते म्हणतात गडा वरील आधी उदक पाहून किल्ला बांधावा ,पाणी नाही आणि ते स्थळ तर बांदने प्राप्त झाले तर आधी खडक फोडून तली-टाकी खंदून प्रज्यन्य काळापर्यंत संपूर्ण गडास पाणी पुरेल एवढी मजबूत बांधणी करावी .गडावर पाणी आहे म्हणून ते पुरते तितक्यावर अवलंबून न राहता उद्योग करावा.लढाईच्या प्रसंगी शत्रू सैनाच्या दारूगोळयाच्या हल्यात किल्या वरील पाण्याचे झरे आटण्याची शक्यता असते. त्यामुळे गडावर मुबलक प्रमाणात पाणीसाठा असावा.त्याकडे महाराजांचे बारकाईने लक्ष होते.साठवलेल्या पाण्याला "जिकेरीयाचे " पाणी म्हटले जात असे . जिकेरीयाचे पाणी साठवून ठेवण्यासाठी गडावर दोन-चार तली-टाकी बांधून त्यात अतिरिक्त पाणी साठून ठेवून ते व्यवस्तीत जतन करावे.ते पाणी स्वच्छ राहील याची काळजी घ्यावी असे आदेश महाराजांनी देले होते.गडावरील पाणी व्यवस्थापनाची उदाहरणे पाहत असताना रायगड,प्रतापगड,शिवनेरी अशा अनेक गडांचे दाखले देता येतील.

वरील सर्व बाबींचा विचार करता छ.शिवाजी महाराजानचा गडावरील जलव्यवस्थापनाची भूमिका भविष्याकडे पाहण्याची दूरदृष्टी लक्षात येतो.

**शेतीच्या पाण्याचे व्यवस्थापन:**

शिवकालातील बहुतांश प्रजा हि शेतीवर अवलंबून होती.त्यामुळे या जनतेला सुखी करायचे असेल तर त्यांच्या उत्पन्नात वाढ केल्या शिवाय पर्याय नाही असे महाराजांनी हेरले होते. शेती हि नैसर्गिक जल स्त्रोतांवर अवलंबून असल्यामुळे.पावसाळयात मुबलक असणारे पाणी उन्हाळयात पिण्यासाठी मिळत नव्हते त्यामुळे या पाण्याचा योग्य वापर होण्यासाठी योजना आखणे आवशक होते.त्यासाठी छ. शिवाजी महाराज यांनी योजना आखली ती म्हणजे बंधारे बांधने व कालवे खुदून हे पाणी पाणी शेतीस पुरवणे. छ. शिवाजी महाराज यांनी जलव्यवस्थापन व सरकारच्या सोयीसाठी शेतीचे बागायती व जिरायती असे दोन प्रकारे वर्गीकरण केले होते.स्वराज्यात शेती सिंचनाचे तीन प्रकार केले होते. पहिला प्रकार म्हणजे छोटे छोटे नाले खोदणे किवा बंधारे बांधने आणि पाठच्या सहायाने शेतीस पाणी पुरवणे त्याला पाटस्थळ असे म्हणत.दुसऱ्या प्रकारात शेतात विहिरी खोदुन मोटच्या सहायाने शेतीस पाणी देणे त्याला मोटस्थळ म्हणत तर तिसऱ्या प्रकारात छोट्या ओढ्यांना थोड्या उंचीच्या ठिकाणी बांध घालून जमिनीला पाणी पुरवणे त्याला फुग्याखालील जमीन असे म्हणत

छ. शिवाजी महाराजानी बंधारे बांधणे कालवे खोदणे आणि त्याची देखभाल करणे या कामात जनतेला सहभागी करून घेतले होते .ज्या शेतकर्यांनी कालवे खोदून जमिनीला पाणी देले त्यांना महाराजांनी जमिनी आणि इतर बक्षिसे देऊ केली होती.असी कालव्याची कामे नाशिक जिल्यातील दिंडोरी तर सातारा जिल्यातील वाई भागात मोठ्या प्रमाणात झालेली दिसतात महाराजानी १५ फेबुवारी १६७० मध्ये एक पत्रक कडून पाटाचे पाणी आठवड्यातून एकदाच शेतीसाठी वापरावे असे आदेश दिले होते.यातून महाराजानचे जलव्यवस्थापना बरोबरच पाण्याचे योग्य नियोजन कसे असावे ते दिसून येते.

**निष्कर्ष :**

१) शिवपूर्व काळातील मानव हा नैसर्गिक जलस्त्रोवर अवलंबून होता .
२) मानवाच्या वाढत्या लोकसंखेमुळे जलस्त्रोवर तान येत असून जलव्यवस्थापनाची आवशकता भासत आहे.
३) छ. शिवाजी महाराज यांची जलनीती महत्वाची आहे .
४) छ. शिवाजी महाराज यांचे जलव्यवस्थापनाचे कामे मर्गदर्शक ठरतात.
५) जलव्यवस्थापन हे काळाची गरज आहे असे दिसते .

**संदर्भ सूची**


**१)** डॉ.मदन मार्डीकर ,मराठ्यांचा इतिहास, विद्या बुक पब्लिकेशन औरंगाबाद.
२) डॉ.राजेंद्र धाये,डॉ.रामभाऊ मुटकुळे,छत्रपती शिवाजी महाराज आणि शिवकाळ,अरुणा प्रकाशन लातूर, २०२१
३) वा.सी बेंद्रे,श्री छ.शिवाजी महाराजांचे चिकित्सक चरित्र,
४) डॉ.अनिल कठारे,मध्ययुगीन भारताचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन जळगाव,२०१३
५) प्रा.टी.के.बिरादार, मराठ्यांचा इतिहासम,विद्या भारती प्रकाशन लातूर,२०००.
६) श्रीमंत कोकाटे,विश्ववंद्य छत्रपती शिवाजी महाराज, जिजाई प्रकाशन,पुणे,२०१२.